BDC LIBRARY
New Paper Clipping
A.Y. 2023-2024



पाटण : महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी निदर्शने करताना.

# पाटणला देसाई कॉलेजचे कर्मचारी बेमुदत संपावर

पाटण : राज्यातील विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी येथील बाळासाहेब देसाई कॉलेजचे कर्मचारी बेमुदत संपावर गेले आहेत. राज्यातील विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित असणाऱ्या सुधारित सेवा अंतर्गत आस्वाशित प्रगत योजनेचा रद्द केलेला शासन निर्णय पूर्णजीवित करणे, १०, २०, ३०, लाभाची योजना शिक्षकेतर यांना लागू करणे, सातव्या वेतन आयोगाची फरकाची रक्कम त्वरित मिळावी, रिक्त पदे भरण्यात यावी, तसेच २००५ नंतर सेवेत रुजू झालेल्या जुनी पेंशन योजना लागू करावी, अशा मागण्यांसाठी महाविद्यालयीन प्रवेश द्वारावर निदर्शने, काळ्या फिती लावून काम, एक दिवसीय लाक्षणिक संप आणि आता शेवटचा टप्पा म्हणून २० फेब्रुवारीपासून बेमुदत संपावर गेले आहेत. दरम्यान, गुरुवारी राज्य सरकारने या मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी एक दिवसाचा लाक्षणिक संप केला होता. त्यात मागण्या मान्य न झाल्यास २० फेब्रुवारीपासून सर्व अकृषी विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी बेमुदत बंद आंदोलनाचा इशारा दिला होता. त्यानुसार संपावर गेले आहेत. राज्यातील विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारीच्या प्रलंबित मागण्यांकडे राज्य शासनाने गांभीर्याने लक्ष घालावे, अशी मागणी संघटनांच्या वतीने करण्यात आली आहे.